बुधवार, दि २८ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २१ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# ‘हिंद-दी-चादर’ गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नांदेड येथे हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाला लाखो भाविकांची उपस्थिती

‘हिंद-दी-चादर’ गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नांदेड येथे हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाला लाखो भाविकांची उपस्थिती





**नांदेड । प्रतिनिधी** - हिंद-दी-चादर गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते. त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, नवी दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मनजिंदर सिंघ सिरसा, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार जितेंद्र अंतापूरकर, आमदार रवींद्र चव्हाण, राज्य अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, गुरूव्दारा बोर्डाचे प्रशासक डॉ.विजय सतबीर सिंघ, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

श्री गुरु नानक देवजींना मानणारा, त्यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारा सर्व समाज एकत्र आणण्याचा **पान २ वर**

## १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कार्यक्रम

# छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालय राज्यात दुसरे



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात दुसरा क्रमांक मिळविला आहे.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात ई-गव्हर्नन्स उपक्रमांची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर तसेच नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आल्याने विभागाला हे यश मिळाले आहे.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या या मूल्यमापनात कार्यालयाची वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (), ब्लॉकचेन तसेच तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात झालेला वापर या सात निकषांवर कामगिरी तपासण्यात आली.

राज्यात दुसरा क्रमांक मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सर्व विभागप्रमुखांशी संवाद साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी **पान २ वर**

# जालना जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना सुवर्णसंधी

## १६ वर्षांखालील मुलांची जिल्हा संघ निवड चाचणी १ फेब्रुवारीला

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील होतकरू आणि गुणवंत क्रिकेटपटूंना स्वतःची प्रतिभा सिद्ध करण्याची मोठी संधी मिळणार असून जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना यांच्या वतीने १६ वर्षांखालील मुलांची जिल्हा संघासाठी निवड चाचणी रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही निवड चाचणी साई काणे क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर, एमआरडीए स्कूलजवळ, रोहनवाडी रोड, जालना येथे होणार आहे.




महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) यांच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा लवकरच होणार असून त्या स्पर्धांसाठी जालना जिल्ह्याचा मजबूत संघ तयार करण्याच्या दृष्टीने ही निवड चाचणी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील होतकरू खेळाडूंना समान संधी मिळावी, या उद्देशाने ही चाचणी खुल्या स्वरूपात घेतली जाणार आहे.

या निवड चाचणीसाठी १ सप्टेंबर २०१० नंतर जन्मलेल्या मुलांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी ठरलेल्या वेळेत आणि ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच निवड प्रक्रियेदरम्यान जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, शाळेचे टी.सी., दहावीची सनद (लागू असल्यास) यांसारख्या कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत आणणे बंधनकारक राहील. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. नरेंद्र देशपांडे, सचिव राजू काने, तसेच सदस्य अभिजीत चव्हाण, दिलीप शाह यांच्यासह असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने खेळाडूंना या निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यांनी सांगितले की, निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असून ही संधी त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीसाठी मैलाचा दगड ठरू शकते.

खेळाडूंनी निवड चाचणीसाठी पूर्ण क्रिकेट पोशाखात येणे, स्वतःचे बॅट, पॅड, ग्लोव्हज, हेल्मेट यांसारखे क्रिकेट साहित्य सोबत आणणे आवश्यक आहे. शिस्तबद्ध उपस्थिती, शारीरिक तंदुरुस्ती आणि कौशल्याच्या आधारे निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवली जाणार असल्याचेही असोसिएशनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८२३३७३३६१ किंवा ९९२२९३३१३८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

ही निवड चाचणी जालना जिल्ह्यातील क्रिकेटच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून, भविष्यातील राज्य व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडवण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया निर्णायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

# कलमं थांबवता येतील, कॅमेरे हिसकावता येतील, पण सत्याचा आवाज दाबता येत नाही

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री यांच्या जालना दौऱ्याकडे सुरुवातीला मोठ्या अपेक्षेने पाहिले जात होते. जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्न, बोकाळलेले अवैध धंदे, रखडलेली विकासकामे आणि नागरिकांच्या वाढत्या असंतोषाला दिलासा मिळेल, अशी आशा होती. मात्र, हा दौरा पुन्हा एकदा 'उद्घाटन-भूमिपूजन-आढावा बैठक-फोटोसेशन' या चौकटीत अडकून राहिला आणि जालनेकरांच्या मूलभूत प्रश्नांना स्पर्शही झाला नाही, हीच खेदजनक वस्तुस्थिती आहे. पालकमंत्री म्हणजे जिल्ह्याचा राजकीय पालक. जिल्ह्यातील समस्या ऐकून घेणे, प्रशासनाला दिशा देणे, आणि गरज पडल्यास कठोर भूमिका घेणे हे त्यांचे मुख्य कर्तव्य असते. मात्र जालन्यातील वास्तव पाहता, पालकमंत्री केवळ ठरावीक कार्यक्रमांना उपस्थित राहतात आणि लगेच परत जातात, अशीच नागरिकांची भावना झाली आहे. ''ध्वजारोहण ते ध्वजारोहण उपस्थिती'' अशी टीका अनेक वर्षांपासून होत आहे. पालकमंत्री बदलावा, अशी मागणीही वेळोवेळी पुढे आली, पण याकडे वरिष्ठ पातळीवरून दुर्लक्ष झाले. जालना दौऱ्यादरम्यान काही पत्रकारांवर पोलिसांकडून करण्यात आलेली धक्काबुक्की आणि व्हिडीओ-फोटो चित्रीकरणास घातलेला मज्जाव ही केवळ एखादी छोटी घटना नाही, तर ती लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी गंभीर बाब आहे. पत्रकार हे कुणाचे वैयक्तिक नोकर नाहीत, ते जनतेचे प्रतिनिधी असतात. प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर नजर ठेवण्याची जबाबदारी पत्रकारांवर असते. अशा स्थितीतच जर पत्रकारांनाच दहशतीखाली ठेवले जात असेल, तर सामान्य नागरिकांच्या हक्कांचे रक्षण कोण करणार? पोलीस हे कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षक असतात. मात्र, जालना दौऱ्यात घडलेली घटना पाहता पोलीस सत्तेचे अंगरक्षक असल्याप्रमाणे वागत असल्याचे चित्र दिसते. सत्ताधाऱ्यांना गैरसोयीचे प्रश्न विचारले जाऊ नयेत, यासाठी पत्रकारांना रोखले जात असेल, तर ही हुकूमशाही मानसिकतेची नांदी आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही, तर तो नागरिकांचा आणि पत्रकारांचा मूलभूत अधिकार आहे. आज देश प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना, त्याच दिवशी पत्रकारांना आपले कर्तव्य बजावण्यापासून रोखले जाणे हा प्रजासत्ताक मूल्यांचा अपमान आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा भारतीय राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. पोलिसांनी किंवा प्रशासनाने या अधिकारांवर गदा आणणे म्हणजे थेट संविधानाची पायमल्ली होय. या घटनेच्या निषेधार्थ पत्रकारांनी पालकमंत्र्यांच्या पत्रकार परिषदेला बहिष्कार घातला, ही कृती अत्यंत योग्य आणि स्वाभिमानी आहे. यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली की, पत्रकार अजूनही दबावाला झुकणारे नाहीत. मात्र, यापेक्षाही मोठा प्रश्न असा आहे की, पालकमंत्र्यांनी स्वतः पुढाकार घेऊन या घटनेची चौकशी का केली नाही? दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई का जाहीर झाली नाही? जर आज पत्रकारांवर हल्ला झाला आणि उद्या सामान्य नागरिकांवर झाला, तर आश्चर्य वाटायला नको. कारण सत्तेच्या दडपशाहीला जेव्हा मोकळीक दिली जाते, तेव्हा तिचा पहिला बळी पत्रकारिताच ठरते आणि पुढचा बळी सर्वसामान्य जनता असते. जालना जिल्ह्यात पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात केवळ निवेदन देऊन भागणार नाही. दोषींवर निलंबनाची, बदलीची आणि विभागीय चौकशीची ठोस कारवाई झाली पाहिजे. तसेच भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, याची हमी पालकमंत्र्यांनी जालनेकरांना दिली पाहिजे. पत्रकारितेला दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी लक्षात ठेवावे कलमं थांबवता येतील, कॅमेरे हिसकावता येतील, पण सत्याचा आवाज कधीही दाबता येत नाही. जालना जिल्ह्यात आज अवैध धंद्यांचे साम्राज्य उभे राहिले आहे. अवैध वाळू उपसा, वाहतूक व साठवणूक खुलेआम सुरू आहे. सट्टा, मटका, जुगार, वेशाव्यवसाय बिनधास्त चालू आहेत. गावठी कट्टे, तलवारी आणि अन्य शस्त्रांची संख्या वाढत आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढत असताना, प्रशासन आणि राजकीय नेतृत्व गप्प का आहे? सर्वसामान्य नागरिकांमध्ये अशी भावना आहे की, या अवैध धंद्यांना पोलिसांचेच पाठबळ आहे. जर हे खरे असेल, तर ही अत्यंत गंभीर बाब असून पालकमंत्र्यांनी यावर ठोस कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, याबाबत कोणतेही ठोस निर्देश किंवा कठोर भूमिका समोर आलेली नाही. पालकमंत्र्यांनी भटक्या श्वान नियंत्रण केंद्र, कुंडलिका-सीना नदी स्वच्छता अभियान आणि घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्घाटन केले, हे स्वागतार्ह आहे. परंतु, फक्त नवीन प्रकल्पांची उद्घाटने करून जुन्या प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे हा विकास नाही. प्रशासनाने पुढे पाठ आणि मागे सपाट असा कारभार करू नये, हीच जालनेकरांची अपेक्षा आहे. आज जालन्याला उद्घाटनांचे मंत्री नाहीत, तर खंबीर, कडक आणि जिल्ह्याच्या प्रत्येक प्रश्नावर लक्ष देणारे पालकमंत्री हवे आहेत. जे अवैध धंद्यांवर बुलडोझर चालवतील, भ्रष्ट कंत्राटदारांना जेलची हवा खायला लावतील आणि प्रशासनाला कामाला लावतील, असे नेतृत्व जालनेकर मागत आहेत. वरिष्ठ पातळीवरून आता तरी याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

पान १ वरुन

## हिंद दी चादर ...

हा प्रयत्न आहे. देशाच्या विपरीत परिस्थितीत श्री गुरु नानक देवजींनी एकत्र बांधणारा, भेदाभेद नष्ट करणारा महान विचार दिला आहे. त्या विचारांनी संपूर्ण देशात विविध समाजांना जोडण्याचे काम केले. हा विचार घेवून सर्व समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील महान संत होते. त्यांची समाधी पंजाबमधील घुमान येथे आहे. संत नामदेवांनी मांडलेले विचार, त्यांचे अभंग आणि पंक्ती यांना श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांचे विचार गुरुबाणीचा अविभाज्य भाग बनले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील वारकरी परंपरा आणि शीख समाज यांच्यातील अनोखे, अतूट नाते अधिक दृढ झाले आहे. श्री गुरु गोविंद सिंघ महाराजांच्या दीर्घकाळ वास्तव्याने नांदेडची भूमी पावन झाली आहे. या भूमीने सामाजिक सलोखा अधिक मजबूत करण्याचे काम केले असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवी सांस्कृतिक वारशाच्या रक्षणासाठी होते.जुलमी शासकांच्या दमनकारी धोरणांविरुद्ध विचार स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले गुरु तेग बहादुर जी यांचे बलिदान हे अभूतपूर्व ऐतिहासिक उदाहरण असून,त्यांच्या निर्भय आचरणातून धार्मिक व नैतिक दृढतेचा आदर्श मिळतो,असे त्यांनी सांगितले.

धर्मतत्त्वज्ञान जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी देशभर प्रवास करून आध्यात्मिक,सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी रचनात्मक कार्य केले.अंधश्रद्धा व अपप्रथांविरुद्ध त्यांनी प्रबोधन केले, तसेच विहिरी खोदणे, धर्मशाळा उभारणे, दानधर्म व प्राणीसेवा यांसारखी सार्वजनिक कल्याणाची कामे केली, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आपल्या भाषणाला मराठी भाषेत सुरुवात करत महाराष्ट्रात पुन्हा येऊन आनंद झाल्याचे सांगितले. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानाच्या स्मरणासाठी होणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरेल, असे ते म्हणाले. गुरू तेग बहादूर जी यांच्या जीवनाचा आदर्श घेत युवकांनी देशाला नव्या उंचीवर घेवून जाण्याचा, तसेच देशाला अखंडीत ठेवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतिहासातून सामर्थ्यासोबत सद्भाव जपण्याचा संदेश महाराष्ट्राने दिला आहे, असा उल्लेखही श्री. कल्याण यांनी केला.

दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मजिंदर सिंघ सिरसा म्हणाले, या समागम कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले, याचा आनंद आहे. अतिशय भव्य कार्यक्रमाचे आयोजन राज्य शासन व नऊ समाजाच्या सहभागातून केले आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास जगासमोर आणण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्षात आणला. नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत होत असलेल्या या समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानत हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या मातीतील विविध समाजाला एकत्र आणणारा ठरल्याचे त्यांनी सांगितले.

संत ज्ञानी हरनाम सिंघ म्हणाले, संत नामदेव यांनी पंजाब आणि महाराष्ट्राला जोडण्याचे काम केले, त्यानंतर श्री गुरु गोविंद सिंघ यांनी महाराष्ट्रात येवून दोन्ही राज्यातील समाजाला जोडण्याचे काम केले. देशावर जेव्हा संकट आले, तेव्हा महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांनी शौर्य दाखविले. ज्या धार्मिक सभ्यतांसाठी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी बलिदान दिले, त्या धार्मिक सभ्यता जपण्याचा, त्यांना आपल्या जीवनाचा हिस्सा बनविण्यासाठी संकल्प युवा वर्गाने करावा, असे आवाहन त्यांनी केले. शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. तसेच शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा असणाऱ्या नऊ समाजांना पहिल्यांदाच एकत्र आणून आयोजित केलेला हा कार्यक्रम समाजाला जोडणारा आहे.नऊ समाज श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्याशी जोडले गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात तीन ठिकाणी होणाऱ्या शहीदी समागम कार्यक्रमांच्या निमित्ताने हे समाज पुन्हा एकत्र येत आहेत.शीख समाजाचा इतिहास शाळांमध्ये शिकवला जात आहे, ही अतिशय आनंददायी बाब असल्याचे गुरूद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरू ग्रंथ साहिब जी यांचे दर्शन घेतले. तसेच यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पंच प्यारे यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर बाबा कुलवंत सिंघ, बाबा हरनाम सिंघ, बाबा बलविंदर सिंघ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक अखिल भारतीय धर्म जागरण समितीचे प्रमुख शरदराव ढोले यांनी केले. शहीदी समागम कार्यक्रमाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी आभार मानले.

## छत्रपती संभाजीनगर ...

अपर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अपर विभागीय आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे, अपर विभागीय आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सहआयुक्त राजेश काटकर, उप आयुक्त दादासाहेब वानखेडे, उपआयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त सरिता सुत्रावे, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी विद्याधर शेळके, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# अध्यात्म म्हणजे पलायन नव्हे, तर कर्मयोग !

## भेदिक शाहिरी आणि संतविचारांच्या मंथनातून घडले जीवनदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** सांस्कृतिक कार्य संचालनालय (महाराष्ट्र राज्य) आणि जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा सहावा दिवस अध्यात्म, शौर्य आणि संतविचारांच्या त्रिवेणी संगमाने गाजला. भेदिक शाहिरीच्या माध्यमातून शिव-शक्तीचा जागर, शाहिरी क्षेत्रातील महिलांचे ऐतिहासिक योगदान आणि संत ज्ञानेश्वरांचे विचारधन असा वैचारिक मेळाच यावेळी विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाला.

या शिबिराच्या सहाव्या दिवसाची सुरुवात अत्यंत भारलेल्या वातावरणात झाली. शिबिराचे मुख्य आकर्षण ठरले ते कलगी शाहीर रामचंद्र जाधव यांचे मार्गदर्शन. त्यांनी केवळ शाहिरी सादर केली नाही, तर भेदिक शाहिरी ही एक जीवनदृष्टी असल्याचे अधोरेखित केले. ''अध्यात्म म्हणजे कर्मातून पलायन नव्हे, तर कर्म अधिक शुद्ध आणि अर्थपूर्ण बनवण्याचा मार्ग आहे,'' या त्यांच्या विधानाने उपस्थितांना विचारप्रवण केले. शिव-शक्तीच्या महतीवर आधारित त्यांच्या भेदिक शाहिरी सादरीकरणाने उपस्थित विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. आत्मशुद्धी, संयम आणि विवेक या मूल्यांची पेरणी करत त्यांनी शाहिरीला अध्यात्माची जोड दिली.

शौर्याला संस्कारांची जोड दुसऱ्या सत्रात महिला शाहिर माधवी देवानंद माळी यांनी शाहिरीत महिलांचे योगदान या विषयावर प्रकाश टाकला. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या शौर्यामागे आई-वडील आणि गुरूंनी दिलेले संस्कार असतात, असे सांगतानाच त्यांनी, ''शौर्याला जर संस्कारांची जोड असेल, तर ते कार्य दीर्घकाळ टिकते,'' असे मत व्यक्त केले. शाहिरीच्या माध्यमातून महिलांनी शौर्य आणि त्यागाचा वारसा कसा जपला आहे, याचा त्यांनी ऐतिहासिक आढावा घेतला.

संतविचार आणि लोककला दुपारच्या सत्रात लोककला अभ्यासक प्रा. भगवान भुंबर यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. ज्ञानेश्वरीतील भक्ती, ज्ञान आणि कर्मयोगाचा समन्वय लोककलेतून कसा मांडता येतो, हे त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. संत विचार हे समाजाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिबिराचा समारोप दिवसभरातील या तिन्ही सत्रांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. केवळ गायकीच नव्हे, तर सामाजिक आणि वैचारिक भान या शिबिरातून मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाला.

बुधवार (दि.२८) रोजी सकाळी १० वाजता शाहीर अजिंक्य लिंगायत यांचे ''शाहीर महर्षी आत्माराम पाटील यांचे शाहिरी योगदान'' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे.

# मराठमोळा ब्रँड देशपातळीवर ठसा उमटवण्यासाठी सज्ज

## रणबीर कपूर पीएनजीचा ब्रँड ॲम्बेसेडर

**नाशिक । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या मातीतून उभा राहिलेला आणि महाराष्ट्राच्या घराघरात विश्वासाचे नाव बनलेल्या पीएनजी ज्वेलर्सने आपल्या प्रवासात एक मोठी झेप घेतली आहे. बॉलिवूडचा सुपरस्टार रणबीर कपूर आता या ऐतिहासिक ब्रँड नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सज्ज झाला आहे. १८३२ पासूनची परंपरा आणि आजची आधुनिकता यांचा मेळ घालत पीएनजी ज्वेलर्स आता देशपातळीवर आपला ठसा उमटवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

याबाबत रणबीर कपूर म्हणाला कि, ''पीएनजी ज्वेलर्स हा पिढ्यान्‌पिढ्यांचा वारसा जपणारा आणि विश्वास व मूल्यांवर उभा असलेला ब्रँड आहे, ज्याचा मी मनापासून आदर करतो. परंपरेचा सन्मान करत भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणाऱ्या या ब्रँडचा भाग होणे



माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि या प्रवासाचा मी अभिमानाने भाग बनत आहे.''

या भागीदारीबद्दल आपला आनंद व्यक्त करताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, ''रणबीर कपूर यांचे व्यक्तिमत्त्व परंपरेचा आदर राखत आधुनिकतेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणारे आहे. जसा पीएनजी ज्वेलर्सने आपल्या मुळांशी निष्ठा राखत काळानुसार स्वतःला विकसित केले आहे, तसेच रणबीर कपूरने एका आयकॉनिक वारशाला प्रामाणिकपणे आणि सुसंगततेने पुढे नेले आहे. ही भागीदारी केवळ दृश्यमानतेपुरती मर्यादित नसून, समान मूल्ये आणि भविष्याकडे पाहणाऱ्या सामायिक दृष्टीकोनावर आधारित आहे.''

या सहकार्याद्वारे पीएनजी ज्वेलर्स आपली ओळख विश्वासाचे प्रतीक, विकसित होत असलेला वारसा आणि कालातीत सौंदर्य म्हणून अधिक मजबूत करत असून, परंपरा आणि आधुनिक भारत यांच्यातील एक सशक्त नाते निर्माण करत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण



**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# चांगला माणूस म्हणून ओळख रहावी

डॉक्टर अनिल अवचट यांची वेध, माणसं, स्वतः विषयी, कार्यमग्न,सुनंदाला आठवताना,ही आणि अजून काही पुस्तके मी वाचली आहेत. डॉक्टर अनिल अवचट यांचं मराठी साहित्यात मोलाचे योगदान होते. त्यांच्या पत्नी डॉक्टर सुनंदा अवचट आणि पु ल देशपांडे यांच्या सहकार्याने त्यांनी व्यसनमुक्ती केंद्र ''मुक्तांगण'' याची स्थापना केली. अनिल अवचट यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील ओतूरचा.बी.जे. मेडिकल कॉलेज मधून ते एम बी.बी. एस. झाले होते. महाविद्यालयात असताना त्यांनी अनेक चळवळींमध्ये भाग घेतला होता.

केवळ साहित्य विश्वताच नाही तर समाजातही त्यांची आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती.. ''मुक्तांगण'' या व्यसनमुक्ती केंद्राची सुरुवात त्यांनी केली. व्यसनींना व्यसनमुक्त करुन पूर्वायुष्यात आणण्याचं काम त्यांनी केलं. मुक्तांगण या संस्थेनं अनेकांची आयुष्य उध्वस्त होण्यापासून वाचविली.. अनिल अवचट हे एक डॉक्टर होतेच मात्र त्यांनी समाज परिवर्तनाचाही सेवेचा वसा उचलला होता. समाजासाठी आपलं आयुष्य खर्ची घालवल.

पत्रकार म्हणून त्यांनी अनेक विषयांवर आपली मतं मांडली, त्यांच्या लेखणीतून, पुस्तकाद्वारे त्यांचे विचार आपल्यापर्यंत पोहोचले.रिपोर्ताज ह्या दिर्घ लेख प्रकाराला त्यांनी सुरुवात केली.

पत्रकार म्हणून समाजाशी अनिल अवचट यांची जवळीक निर्माण झाली ती सामाजिक प्रश्नांचे मांडणीतून. पत्रकार असले तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यावसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपल्या पत्रकारितेने समाजातील दुर्बल घटकांना मदत होईल असे कायम प्रयत्न केले.त्यांना वाचा फोडली. गरिबी, अन्याय आणि भ्रष्टाचाराचे बळी असलेल्या असहाय्य जनतेच्या हितासाठी त्यांनी कार्य केलं. अनिल अवचट यांनी मजूर, दलित, भटक्या जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी अनेक पुस्तकं लिहिली.बाबा आढाव यांच्या चळवळीशी त्यांचे जवळचे संबंध होते.

शिल्पकला, चित्रकला, बासरी वादन, फोटोग्राफी, आणि मुख्य म्हणजे ओरिगामीतून विविध आकार साकारणं हा त्यांचा आवडता छंद होता. केवळ स्वतःचा विचार न करता दुसऱ्यांसाठी सतत काही ना काही करत राहणारा परोपकारी असा त्यांचा स्वभाव होता .

अनिल अवचट हे केवळ एक साहित्यिक नसून त्यांच्या अनेक प्रकारे ओळखी आहेत, त्यांचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या कामां मधून दिसून येतं.

१९६९ साली त्यांचं पहिलं पुस्तक पूर्णिया हे प्रसिद्ध झालं, तेव्हापासून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांवर लिखाण केलं. आतापर्यंत त्यांची पंचविसचे जवळपास पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. त्याआधी वेध नावाचे पुस्तक साधना साप्ताहिकात त्यांनी लिहिलेले लेख एकत्रित करण्यात आले होते.

डॉ. अनिल अवचट यांचं लिखाण प्रभावी आहेच, मात्र त्यांचं समाजकार्यही तितकंच उल्लेखनीय आहे. अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक होते.. मित्राच्या मुलाला महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना तो व्यसनाधीन झाला आणि त्याच्यावर उपचार करताना त्यांनी, पत्नी डॉ. सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची एक अनोखी पद्धत शोधली. जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रांमध्ये त्यांची ही वापरली जाते. मुक्तांगण परिवारातर्फे दरवर्षी डॉ. अनिता अवचट स्मृती संघर्ष सन्मान पुरस्कार दिला जातो.

कार्यमग्न, छंदाविषयी ,जगण्यातले काही, व्यक्तिचित्रे, धागे आडवे उभे, माणसं, पूर्णिया, प्रश्न आणि प्रश्न, रिपोर्टिंगचे दिवस, वेध, सुनंदाला आठवतांना, स्वतःविषयी, अशी जवळपास पंचवीस एक पुस्तके लिहिलीत.

व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी त्यांना राष्ट्रपतीचे हस्ते २०१३ साली राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते. तसेच अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशन चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता. न्यायमुर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान.सातारा, तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कारही त्यांना मिळाला होता.

केवळ भारतातच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कामाचं कौतुक केलं गेलं.

पुढे महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार, फर्ग्युसन गौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं.

सामाजिक प्रश्न, अडचणी सोडवण्यासाठी चे कामा सोबतच बालसाहित्यावरही डॉ. अनिल अवचट यांनी मोठ्या प्रमाणात लिखाण केलं. ''सृष्टीत.. गोष्टीत'' या त्यांच्या पुस्तकाला साहित्य अकादमीतर्फे उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार देण्यात आला. इतकंच नाही तर अनिल अवचट यांची पुस्तकं सलग तीन वर्षे महाराष्ट्र शासनाने ''सर्वोत्कृष्ट पुस्तके'' म्हणून जाहीर केलीहोती.

आपल्या बालपणाबद्दल सांगताना ते एक खंत व्यक्त करतात, ती म्हणजे आमच्या बालपणी ग्रंथालयं नव्हती. काही वाचायचं झालं तर ते साहित्य सहजरित्या उपलब्ध होत नव्हतं. आता तर वाचनाची साधनं असूनदेखील मुलांना वाचनात रस नाही. सतत मोबाईलमध्ये गुंतलेली असतात,, गेम समोर बसून असतात.

आज प्रत्येक माणूस पैशाच्या मागे धावत आहे त्यांना कळत नाही तो का धावत आहे. आणि या धावपळीत त्यांना त्यांच्या कुटुंबासाठी वेळ देता येत नाही, आणि मग त्याला ताण येतो आणि मग तो ताण दूर करणारे काय काय करावे या विचारात आणि शोधत असतो. मग त्यासाठी वाचन करावे, व्यायाम करावा, का फिरायला जावे, अशा गोष्टी करू पाहतात,अनेक जण नैराश्यामुळे व्यसनाधीन होतात. पण मला असे वाटते की ताण दूर करण्यासाठी ताण का येतो ? याचा विचारच करायला हवा. असे ते म्हणत. माझं आहे ते मला नक्की मिळणारच, हाच विचार करून मी जगतो. माणसाकडे निर्मितीचे तत्व आहे .आणि इतके सुंदर तत्व निसर्गाने आपल्याला दिली असताना आपण त्याचा सकारात्मक पद्धतीने विचार करून ताणमुक्त राहायला हवे हे महत्वाचे आहे.हाच विचार त्यांनी मांडला होता.२७ जानेवारी२०२२ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले.

एका मुलाखतीत डॉक्टर अनिल अवचट यांना विचारले की लेखक, डॉक्टर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते,कलाकार, अशा अनेक ओळखी असताना त्यापैकी कोणती ओळख तुम्हाला जास्त भावते असं तुम्हाला वाटतं ? त्यावेळी त्यांनी उत्तर दिले की..... येणाऱ्या पिढीने मला एक चांगला माणूस म्हणून ओळखाव'' .....

अजून आयुष्यात काय मिळवायचे असते.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा. ८९९९५६६९१७**

# अहिर गवळी समाज चौदाव्या सामुहिक विवाह समिती-२०२५ च्या महिला अध्यक्षपदी ॲड. शोभाबाई विजयसेनानी तर सचिवपदी सौ.दिपाली देवावाले यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** जालना अहिर गवळी समाज चौदाव्या सामुहिक विवाह महिला समितीची बैठक, आज दि. २५ जानेवारी २०२५, रविवार रोजी दुपारी ३ वाजता अहिर समाज पंचायत भवन,खडकपूरा, जालना येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी सामुहिक विवाह महिला समितीचे अध्यक्षपदी ॲड. सौ.शोभाबाई शरद विजयसेनानी, उपाध्यक्षा सौ. कमलाबाई रतनलाल शेंडीवाले, राजेश्री मोहनलाल परवलेष्कर, अनिता धन्नुलालजी भगत, मनिषा राधेश्याम विजयसेनानी, सौ. अमृता प्रकाश गोमतीवाले, सौ. मीना कैलास गोमतीवाले, सचिवपदी सौ.दिपाली संदिप देवावाले, मार्गदर्शक कुसुमबाई भागचंद जांगडे, सदस्या सौ. ललिता नरेश नंद, सौ. कविता संजय गौरक्षक, सौ. अनिताबाई भुरेवाल, सौ. ज्योती दिनेश नंद, सौ.ॲड. रत्ना अभयकुमार यादव, सौ. लोकवंतीबाई हंसराजजी भुरेवाल, सौ. रिनाबाई मंडले चौधरी, सौ.कविता संजय गौरक्षक, सौ. भाग्यश्री भरत भुरेवाल, सौ. शिला कुंदन भुरेवाल, सौ. ममता कन्हैय्या काबलीये, सौ. जया देवेंद्र भगत, सौ. आरती सुनिल नंद यांची निवड करण्यात आली. यावेळी अहिर गवली समाजाचे सौ. भारती चंपालाल भगत, सौ. संगिताबाई भगत, सौ.भारतीबाई नंद, सौ. संगिताबाई झाडीवाले, सौ. सुनिताबाई भुरेवाल, मनिषा भुरेवाल, सौ. पुजा तिलक काबलीये, सौ. सपना गणेश खाकीवाले, सौ. शारदाबाई मोहनलाल झाडीवाले, मिनाबाई झाडीवाले, सौ. संगिताबाई गोवर्धनलाल झाडीवाले, सौ.सुनिताबाई दिपक भुरेवाल आदींची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. भारती दिनेश नंद यांनी केले तर आभार पदर्शन सौ. भारती भगत यांनी मानले.




## महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा विभागाकडून सौ. करुणा मोरे यांचा जिल्हा युवा पुरस्काराने गौरव


छाया/जावेद तंबोली

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवा धोरणानुसार जिल्ह्यातील युवकांनी समाजहितासाठी पार पाडलेल्या भूमिकेचा आणि दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यासाठी जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४-२५ चा जिल्हा युवा पुरस्कार (युवती) म्हणून सामाजिक व युवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल करुणा अच्युत मोरे यांना प्रदान करण्यात आला. सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

स्मृतीचिन्ह, मानपत्र, १० हजार रुपयाचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी माजी पालकमंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार राजेश राठोड, माजी आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, क्रीडा अधिकारी श्रीमती लोंढे, आरती चिल्लारे आदींची उपस्थिती होती.

सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानाची शासनाने दखल घेत पुरस्कार प्रदान केल्याने सामाजिक कार्यकर्ते अरविंद देशमुख, रमेश देहेडकर, सौ. रसना देहेडकर, बालाजी बळप, अंकुश काळे, रामकृष्ण हिवाळे, अच्युत मोरे, किरण साळवे यांच्यासह अनेकांनी अभिनंतर केले आहे.

## फ्लॉरेन्स नाईटिंगेल नर्सिंग कॉलेजचे घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील फ्लॉरेन्स नाईटिंगेल जी.एन.एम. नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जी.एन.एम. प्रथम वर्षाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. फ्लॉरेन्स नाईटिंगेल नर्सिंग कॉलेजची ही पहिलीच बॅच असून, प्रथम वर्षाच्या परीक्षेत रीना अनिल ढाकणे या विद्यार्थिनीने ७४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर शुभांगी राजकुमार नखाते हिने ६८.८० टक्के घेत द्वितीय क्रमांक आणि विशाल अशोक गवारे याने ६५.४० टक्के मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे शिव शंकर विठ्ठल पुरी (६५.२० टक्के) आणि आकाश अशोक भालेराव (६१.८० टक्के) हे विद्यार्थी प्रथम श्रेणीत उर्त्तीण झाले आहेत. यावेळी महिवद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गजानन वाळके पाटील व संस्थेचे सचिव अनिकेत वाळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर, शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्करराव दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जीवन सले, अजित मानधनी यांनी अभिनंदन केले आहे.


